मुद्रित १० ......

७७९१

"श्री"
४।११।८२

~~गझल~~ सोंग

~~साठीत~~ आठवांत ~~साठवाया~~ चैतन्य मी निघालो
हृदयात पेटवाया (चैतन्य) मी निघालो -- १

नाबाद खेळलो जे, ते डाव घाव झाले
जखमेतल्या सुखांना सजवून मी निघालो -- २

घेऊनि सोंग कितीदा बाह्यांगी बहुरुप्याचे
माझ्या खऱ्या रूपाला फसवून मी निघालो -- ३

दिक्सा खुल्या दिलाने तारुण्य दान केले
कारुण्य आज त्याचे मिरवीत मी निघालो .. ४

भलत्या बहादूरीचा हव्यास तोलला जो
त्या त्या पराक्रमांना पेलीत मी निघालो . -- ५

४।११।८२

सहदेव मरवामले.